काणकोणच्या नगराध्यक्षपदी नीतू देसाई बिनविरोध

पालिकेच्या २९ व्या नगराध्यक्ष बिनविरोध निवडीबद्दल समर्थकांकडून अभिनंदन, आज गोवा मुक्तीदिनी नगरपालिका इमारतीसमोर करणार ध्वजारोहण

प्रतिनिधी
काणकोण

काणकोण नगरपालिकेच्या २९ व्या नगराध्यक्ष म्हणून भगतवाडा वॉर्डाच्या नगरसेविका नीतू समीर देसाई यांची १८ रोजी बिनविरोध निवड करण्यात आली. महिलांसाठी राखीव असलेल्या या पदावर यापूर्वी प्रार्थना ना. गावकर, समिता धुरी, छाया कोमरपंत यांनी काम पाहिलेले आहे.

याशिवाय आतापर्यंत मारिया फर्नांडिस, सज्जल भगत, चंदा ग्रासियस, सूचना गावकर या महिलांनी नगराध्यक्षपद भूषविलेले असून मारिया फर्नांडिस आणि चंदा ग्रासियस यांनी दोनवेळा नगराध्यक्षपद सांभाळलेले आहे. नोव्हेंबर २०१५ मध्ये झालेल्या पालिका निवडणुकीनंतर नीतू देसाई आणि प्रार्थना ना. गावकर यांनी नगराध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला होता. दोघांनाही समसमान मते मिळाल्यानंतर चिठ्ठी काढून निवड जाहीर करण्याचा प्रसंग आला असता प्रार्थना गावकर यांना नगराध्यक्षपद मिळाले होते. त्यांनी ५ नोव्हेंबर, २०१५ ते ६ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत हे पद सांभाळले. आतापर्यंतच्या महिला नगराध्यक्षांमध्ये समिता धुरी या सर्वांत कमी वेळ सदर पदावर राहिल्या आहेत.

काणकोण : नवनिर्वाचित नगराध्यक्ष नीतू देसाई यांच्यासमवेत विजय पै खोत, उपनगराध्यक्ष श्यामसुंदर देसाई व अन्य नगरसेवक.

भगतवाडा वॉर्डातून निवडून आलेल्यांपैकी राजेंद्र देसाई, सज्जल भगत, समीर देसाई, अजय भगत यांच्यानंतर नीतू देसाई यांना नगराध्यक्षपदाची संधी प्राप्त झाली आहे. या निवडीच्या वेळी भगतवाडा वॉर्डातील समीर देसाई यांचे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. देसाई यांच्या बिनविरोध निवडीबद्दल माजी आमदार विजय पै खोत, सर्व नगरसेवक त्याचप्रमाणे अनेक समर्थकांनी त्यांचे अभिनंदन केले. कुडचडे पालिकेचे मुख्याधिकारी कपिल फडते यांनी निर्वाचन अधिकारी म्हणून काम पाहिले. काणकोणचे मुख्याधिकारी राजू देसाई, पालिका निरीक्षक नम्रता देसाई, पालिका अभियंता विनोद कोठारकर, संतोष कोमरपंत यांनी त्यांना सहकार्य केले.

नीतू देसाई यांचे अभिनंदन करताना विजय पै खोत, नगरसेवक दयानंद पागी, किशोर शेट, उपनगराध्यक्ष श्यामसुंदर देसाई, गुरू कोमरपंत यांनी पालिका क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व नगरसेवक संघटितपणे काम करतील, असे मत व्यक्त केले. भाजपाचे दक्षिण गोवा अध्यक्ष सर्वानंद भगत, काणकोण भाजप अध्यक्ष महेश नाईक, दक्षिण गोवा जिल्हा पंचायत सदस्या डॉ. पुष्पा अय्या, श्रीस्थळचे माजी सरपंच प्रशांत देसाई यांनीही त्यांचे अभिनंदन केले.

मुख्याधिकाऱ्यांवर आरोप

दरम्यान, काणकोण पालिकेचे मुख्याधिकारी कायद्यावर बोट ठेवून सीआरझेड क्षेत्रातील व्यावसायिकांची अडवणूक करतात, असा आरोप याप्रसंगी दयानंद पागी, किशोर शेट यांनी केला. तत्पूर्वी पै खोत यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांच्या एका शिष्टमंडळाने मुख्याधिकारी राजू देसाई यांची भेट घेऊन पालिका क्षेत्रातील कचरा विल्हेवाटीसंबंधी चर्चा केली आणि त्यावर तोडगा काढण्याची विनंती केली.

आज मुक्तीदिन कार्यक्रम

दरम्यान, आज १९ रोजी सकाळी ८.१५ वा. नगरपालिका इमारतीसमोर होणारे ध्वजारोहण नवनिर्वाचित नगराध्यक्षा नीतू देसाई यांच्या हस्ते होणार आहे. त्याचबरोबर काणकोणच्या प्रशासकीय इमारतीसमोर होणाऱ्या ध्वजारोहण समारंभाला नगराध्यक्षा उपस्थित राहणार आहेत. काणकोणचे आमदार इजिदोर फर्नांडिस, उपजिल्हाधिकारी राजू देसाई यांच्या उपस्थितीत हा मुक्तीदिनाचा कार्यक्रम होणार असून यावेळी काणकोण तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांचे संचलन, अंगणवाडी आणि अन्य विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

या कार्यक्रमाला काणकोणच्या नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राजू देसाई यांनी केले आहे.

प्रत्येक गावात निसर्गोपचार केंद्र हवे

डॉ. चंद्रकांत सापळे यांचे मत, पार्से येथे शिबिर

वार्ताहर
पालये

चंद्रकांत सापळे

निसर्गातच औषधे उपलब्ध असून प्राथमिक व तातडीने उपचारासाठी या वस्तूंची जाण तसेच त्याचे गुणधर्म प्रत्येक महिलांनी अभ्यासावेत. तसेच निसर्गोपचारासाठी प्रत्येक गावात केंद्र हवे. यासाठी केंद्रीय आयुषमंत्री श्रीपाद नाईक यांनी प्रयत्न करावेत, असे मत डॉ. चंद्रकांत सापळे (सासोली–दोडामार्ग) यांनी व्यक्त केले.

गोवा पंचायत महिला शक्ती अभियान, पेडणे विभागीय समिती आयोजित जनजागृती शिबिराप्रसंगी आरोग्य या विषयावर ते बोलत होते. पार्से येथील ग्रामपंचायत सभागृहात हा कार्यक्रम झाला.

तहान, भूक, झोप या तीन गोष्टींचा ताळमेळ साधला तर खऱ्या अर्थाने आरोग्य चांगले राहते, असे सांगून डॉ. सापळे यांनी हळद व लवंग आरोग्याला कसे गुणकारी हे सोदाहरण पटवून दिले. आपले कुटुंब आरोग्यमय राखण्यासाठी प्रत्येक महिलेला तातडीने औषधोपचाराची माहिती हवी. आपल्या परिसरात औषधे उपलब्ध असतात. स्वभावावरही औषध उपलब्ध आहे. हे उपचार शिकण्यासाठी प्रत्येक गावात निसर्गोपचार केंद्र असणे गरजेचे आहे. महिलांना, मुलींना आज अनियमित मासिक पाळीचा त्रासही जाणवतो. महिला शक्ती खऱ्या अर्थाने बळकट बनण्यासाठी आरोग्य चांगले राखावे. शारीरिक, मानसिक, बौद्धिक क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने होमियोपॅथीशिवाय पर्याय नाही, असेही डॉ. सापळे म्हणाले.

मन ही मोठी शक्ती आहे. हे मन स्थिर राखण्यासाठी दर दिवशी अर्धा तास ध्यान करणे आवश्यक ठरते. आरोग्यमय जीवन जगण्यासाठी मन, मेंदू, ध्यान हे समीकरण आहे. तसेच ज्याप्रमाणे आपण मोबाईलमधील नको ते मॅसेज डिलिट करतो त्याप्रमाणे जीवनात जगताना सकारात्मक जगले पाहिजे. सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास खऱ्या अर्थाने आरोग्यमय जीवन जगण्याची ऊर्जा प्राप्त होईल, असेही ते म्हणाले.

प्रारंभी गोवा पंचायत महिला शक्ती अभियान, पेडणे विभागीय समितीच्या अध्यक्ष तारिका तुकाराम तारी यांनी स्वागत केले, तर भाग्यश्री मळीक यांनी आभार मानले.

मडगावात सरकारी प्रिंटिंग प्रेसचा विक्री काऊंटर सुरू करावा

प्रतिनिधी
मडगाव

सरकारच्या राजपत्रात अनेक प्रकारची माहिती प्रसिद्ध होत असते. ही माहिती प्रत्येकासाठी महत्वाची असते. त्याचबरोबर सरकार दरवर्षी कॅलेंडर प्रसिद्ध करते. मात्र, राजपत्र व कॅलेंडर मिळविण्यासाठी दक्षिण गोव्यातील लोकांना पणजीत जाणे भाग पडत होते. दक्षिण गोव्यातील लोकांना राजपत्र व कॅलेंडर मडगावात उपलब्ध करावी, अशी मागणी गोवा कॅन या संस्थेने केली आहे.

पूर्वी मडगावच्या कोमुनिदाद इमारतीत सरकारी प्रिंटिंग प्रेसचा विक्री काऊंटर होता. पण, कोमुनिदाद इमारतीची परिस्थिती धोकादायक बनल्याने हा विक्री काऊंटर बंद केला. त्यामुळे दक्षिण गोव्यातील लोकांची गैरसोय होऊ लागली आहे. सरकारचे राजपत्र किंवा कॅलेंडर प्राप्त करण्यासाठी पणजीत जाणे भाग पडत असून लोकांचा वेळ वाया जातो तसेच बसगाड्यातून प्रवास करताना तिकिटांवर देखील पैसे खर्च करावे लागतात, याकडे गोवा कॅनने सरकारी प्रिंटिंग प्रेसचे संचालक दामोदर शंके यांना सादर केलेल्या निवेदनातून लक्ष वेधले आहे.

दक्षिण गोवा जिल्हाधिकारी कार्यालयात तळमजल्यावर सरकारच्या कॅलेंडरची विक्री करण्यासाठी २४ डिसेंबर पूर्वी काऊंटर सुरू करावा अशी मागणी या निवेदनातून केली आहे. सरकारचे नियम व कायदे हे सरकारी प्रिंटिंग प्रेसमधूनच उपलब्ध होत असतात, त्यामुळे मडगावात प्रिंटिंग प्रेसचा विक्री काऊंटर उपलब्ध व्हायलाच पाहिजे असे निवेदनात म्हटले आहे.

दरम्यान, नव्या जिल्हाधिकारी कार्यालयातील तळमजल्यावर दुकान नं. १२ हे सरकारी प्रिंटिंग प्रेसकडे सुपूर्द केले असून त्या ठिकाणाहून सरकारचे राजपत्र तसेच कॅलेंडरची विक्री लवकरात लवकर करावी असे गोवा कॅनचे निमंत्रक रॉलांन्ड मार्टिन्स यांनी म्हटले आहे.

'अभाविप'तर्फे रॅली...

पणजी : गोवा मुक्तीदिनाच्या पूर्वसंध्येला अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे पणजीत काढलेली मिरवणूक. (तुळशिदास राऊळ)

इब्रामपूर सरकारी विद्यालयात उद्या स्नेहसंमेलन

धारगळ : इब्रामपूर येथील सातेरी विद्यामंदिर हायस्कूल, सरकारी प्राथमिक विद्यालय व हेदूस येथील सरकारी प्राथमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण कार्यक्रम गूरूवार २० डिसेंबर रोजी संध्या. ५.३० वा. सातेरी हायस्कूलमध्ये होणार आहे.

शिवोलीत आज श्रीसाईसच्चरित चक्री पारायण

वार्ताहर
शिवोला

शिवोली येथील श्री स्वामी समर्थ मठात अखिल गोमंतक साई सेवा मंडळ गोवातर्फे आज बुधवार दि. १९ रोजी सकाळी श्री सद्गुरु साईनाथांच्या समाधी शताब्दी महोत्सवातील २० वे श्री साईसच्चरित चक्री पारायण आयोजित केले आहे. त्यानिमित्त सकाळी साईसच्चरित ग्रंथाचे पालखीसह स्वामी समर्थ मठ ते थिएटर जंक्शन मार्गे तसेच तार शिवोली येथून समर्थ मठात आगमन होईल. दुपारी आरती, तीर्थप्रसाद व महाप्रसाद होणार आहे. पूजेचे यजमानपद समीर वायंगणकर, स्वरा वायंगणकर तसेच हर्षेष गोवेकर व दीपिका गोवेकर भूषवतील.

सायं. ४ वा. गीता जयंतीनिमित्त श्लोक पठणाचा कार्यक्रम वसंत विद्यालयातर्फे आयोजित केला आहे.

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
शुद्धिपत्रक
गोवा राज्यामध्ये २५.११.२०१८ रोजी ह्या वर्तमानपत्रामध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या रेग्युलर / ग्रामीण रिटेल आउटलेटच्या (पेट्रोल पंपाच्या) डीलरशिपच्या नियुक्तीसाठीची नोटीस ह्या जाहिरातीसंबंधात शुद्धिपत्रक
ऑनलाइन आवेदन सादर करण्याची अंतिम तारीख २४.१२.२०१८ अशी करण्यात आलेली आहे. इतर सर्व अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.
तपशीलवार जाहिरात आणि पुस्तिका हे www.petrolpumpdealerchayan.in ह्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.
एनरजाइजिंग लाइव्ज, एनरजाइजिंग बिझनेस

फक्त तीन प्रयोग! हसा आणि फक्त हसा !!!

शनिवार, २२ डिसेंबर २०१८ राजीव कला मंदिर – फोंडा दुपारी ३.०० वाजता
ति.वि. कल्पना आईस्क्रीम पार्लर – फोंडा येथे सुरू फोन : 9607055373

रविवार, २३ डिसेंबर २०१८ कला अकादमी सकाळी १०.३० वाजता
ति.वि. पेस्ट्री पॅरडाईस – पणजी येथे सुरू फोन : 9881747915

रविवार, २३ डिसेंबर २०१८ रविंद्र भवन मडगाव रात्रौ. ०८.३० वाजता
ति.वि. कॅफे तातो – के.टी.सी बस स्टँड – मडगाव येथे सुरू फोन : 9923765475

धमाल विनोदी नाट्यकृती

॥ भद्रकाली ॥ प्रॉडक्शन्स — प्रसाद कांबळी सादर करीत आहे
वस्त्रहरण
मराठी टी.व्ही आणि सिनेमा सेलिब्रिटीसह
लेखक गंगाराम गवाणकर दिग्दर्शक कै. रमेश रणदिवे तालीम मास्तर मंगेश कदम
कलाकार : रेशम टिपणीस, अंशुमन विचारे, किशोर चौघुले, किशोरी अंबिये, समीर चौघुले, देवेंद्र पेम, प्रदीप पटवर्धन, प्रभाकर मोरे, प्रणव रावराणे, मुकेश जाधव, मनमीत पेम, गोट्या सावंत, मयुरेश पेम, शशिकांत केरकर, सचिन सुरेश, तात्या सरपंचाच्या भूमिकेत दिगंबर नाईक

मोरजीत पर्यटकांचा ३२ लाखांचा ऐवज लंपास

प्रतिनिधी
पेडणे

मोरजी–आश्वे सीमेजवळ असलेल्या सुर्लामार हॉटेलमध्ये थांबलेल्या मुंबई येथील नवदाम्पत्याचे दागिने, मोबाईल असा सुमारे ३२ लाख रुपयांचा ऐवज चोरीला गेला. याप्रकरणी तक्रार मुंबई येथील मिकिल पिन्टो यांनी पेडणे पोलीस स्थानकात दिली आहे.

मुंबई येथील उद्योजक मिकिल पिन्टो व त्यांची पत्नी सिना हे दोघेही मोरजी येथील सुर्लामार हॉटेलममध्ये थांबले होते. सोमवारी १७ रोजी मध्यरात्रीनंतर २.३० वाजता च्या सुमारास ते राहत असलेल्या १०४ क्रमांकाच्या खोलीत चोरट्यांनी प्रवेश करून सुमारे ३२ लाख रुपयांचा ऐवज लंपास केला. यात दोन डायमंड रिंग, एक डायमंडचा नेकलेस, सोन्याची अंगठी, दोन ॲपल कंपनीचे मोबाईल फोन, दोन ॲपल कंपनीचे आयपॅड, रोख रुपये ५ हजार मिळून सुमारे ३२ लाख रुपयांचा ऐवज चोरल्याची तक्रार पेडणे पोलीस स्थानकात दिली आहे.



पेडणे : मोरजी येथील सुर्लामार हॉटेलच्या खोलीतून ऐवज लंपास केला.

चोरटे फरार...
- मोरजी सुर्लामार हॉटेलातील घटना
- पेडणे पोलिसांत तक्रार दाखल, हॉटेल कर्मचाऱ्यांची चौकशी

चोरट्यांचा खिडकीतून आत प्रवेश

चोरट्यांनी खोलीच्या खिडकीतून आत प्रवेश करून हा सर्व ऐवज लंपास केला. यावेळी हे दाम्पत्य खोलीत झापले होते, अशी माहिती पेडणे पोलिसांनी दिली.

हॉटेलला सीसीटीव्ही कॅमेरा नाही

सदर दाम्पत्य थांबलेल्या या हॉटेलला सी.सी. टीव्ही कॅमेरा नव्हता. त्यामुळे चोरट्यांनी बिनधास्त खोलीत प्रवेश करुन ही चोरी केली. खोलीच्या बाहेर कॅमेरे बसविले असते तर चोरटे कॅमेरात कैद झाले असते.

हॉटेल चालकाचा निष्काळजीपणा

पेडणे पोलिसांनी पेडणे तालुक्यातील समुद्र किनारी भागात असलेल्या हॉटेलमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्याचे पत्र पाठविले होते. मात्र हॉटेल व्यवसायिक या गोष्टीकडे कानाडोळा करत असल्याने असे प्रकार वारंवार घडत आहेत. चोरीचा पंचनामा केला जातो, मात्र पुराव्या अभावी तसेच कुठलेच धागेदोरे पोलीस यंत्रणेला मिळत नसल्याने अशा चोऱ्या वारंवार होत आहेत.

या चोरीची माहिती मिळताच पेडणे पोलिस स्थानकाचे निरीक्षक संदेश चोडणकर, उपनिरीक्षक प्रफुल्ल गिरी, पोलीस उपअधीक्षक सेरोफिन डायस यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली.

श्वान पथक व ठसे तज्ज्ञ पथकाला केले पाचारण

चोरीची माहिती पोलीस निरीक्षक संदेश चोडणकर यांनी आपल्या वरिष्ठांना दिल्यानंतर वरिष्ठ अधिकारी सेरोफिन डायस यांनी तपास कामासंबंधी सूचना केल्या. उपनिरीक्षक प्रफुल्ल गिरी यांनी चोरीचा पंचनामा करुन अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा नोंद केला. त्यांना पोलीस कॉन्स्टेबल दयेश खांडेपारकर व इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

हॉटेलच्या कर्मचाऱ्यांची चौकशी

सुर्लामार हॉटेलच्या कर्मचाऱ्यांना पेडणे पोलिसांनी चौकशीसाठी बोलावून पेडणे पोलीस स्थानकात घेतले. सायंकाळी उशिरापर्यंत त्यांची चौकशी सुरु होती. निरीक्षक संदेश चोडणकर यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक पेडणे पोलीस या चोरीचा तपास करीत आहेत.

॥ श्री शांतादुर्गा प्रसन्न ॥
श्री शांतादुर्गा यूवा संस्था, कोळंबा, रिवण
व
कला व सांस्कृतीक खाते गोवा सरकार
पणजी - गोवा
Reg.No.: 441/Goa/2010
निमंत्रण
आज बुधवार, दि. १९.१२.२०१८
"वर्धापनदिन सोहळा"
रात्रौ ७.00 वा. कोकणी नाटक
शारदा सेल्फ हेल्प मंडळ कोळंबा, प्रस्तुत
"हांव सायबा मॉडन जाता"
रात्रौ ८.00 वा. गिरीश कला केंद्र सावर्डे प्रस्तुत
"गोंयची अस्मीताय"
स्थळः सरकारी विद्यालय मैदान कोळंबा-रिवण
कमिटी
श्री शांतादुर्गा यूवा संस्था, कोळंबा-रिवण
टिप : येळेनुसार कार्यक्रमात फेरबदल केला जाईल

Shree shantadurga Verdekarin Prassann
Talwada Veroda
Cuncolim Salcete Goa
DRAW
Date: 17/12/2018

PRIZES	COUPON NO
1st -	3163
2nd -	1141
3rd -	2501
4th -	2755

Consolation Prizes
1- **1005**, 2- **3933**, 3- **3345**, 4- **1148**, 5- **4644**, 6- **4415**, 7- **4045**, 8- **1605**, 9- **3761**, 10- **2064**.

नोकरी संदर्भ ! नोकरी संदर्भ !!

Angriya Cruises
India's First Domestic Cruise

We are hiring for Goa...
Marketing Manager-1Post
Candidate having experience in Travel & Tourism, Hospitality Services, Agents Network, Charters, Corporate events, Wedding planners may apply.
Marketing Executives-2Posts
Candidates from Tourism background, Hospitality Services may apply. Need to do field work, back end mailing and follow ups.
Office Assistant (Secretary)-1Post
To handle coordination with other teams, vendors, logistics Bookings, other back office jobs.
Please mail your resume to
admingoa@angriyacruises.com
by thursday 20/12/2018 evening 5pm
Angriya Sea eagle Pvt Ltd.
Cruise Terminal Building, Opposite Customs Office, Harbour, Nr. Breakwater Gate, Headland Sada, Mormugao, Vasco Da Gama, Goa, 403804

जाहीर निमंत्रण

श्रीमद् भागवत महापुराण सप्ताह
१५ वी अखिल गोवा भगवद्गीता पाठांतर स्पर्धा
श्रीमद् भगवद्गीता परमधाम संस्थान कुंकळ्ळी आणि कला संस्कृती संचालनालय गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत
'मोक्षदा एकादशी व भगवद्गीता जयंती' निमित्त
आज बुधवार दि. १९ डिसेंबर, दुपारी २.३० ते ६.०० पर्यंत
अखिल गोवा भगवद्गीता पाठांतर स्पर्धा व बक्षिस वितरण कार्यक्रम

प्रमुख पाहुणे – खासदार, **नरेंद्र सावईकर,**
निमंत्रीत पाहुणे– माजी आमदार, **राजन नाईक**
व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.
सायंकाळी ७.३० ते ९.३० वाजता –
निशिकांतबुवा टेंगसे यांचा किर्तनाचा कार्यक्रम.
भागवत पुराण सप्ताह
राजस्थानचे भागवतकार– **प.पू. श्री हरीशरणजी महाराज** यांचा **प्रवचन (निरुपण)** कार्यक्रम
दि. २० डिसेंबर ते २७ डिसेंबर
वेळ– रोज सायंकाळी ५.३० ते ९.३० पर्यंत.
-: विस्तारीत कार्यक्रम :-
आज सकाळी ६ ते ९ – श्रींची महापूजा, अभिषेक, ९ ते १० – श्रीविष्णु सहस्त्रनामावली, १० ते ११ – श्रीमद् भगवद्गीता वाचन, ११ ते दुपारी १२.३० – प्रार्थना व हरिपाठ, १२.३० ते १.३० – आरती, तीर्थप्रसाद, १.३० ते २.३० महाप्रसाद, २.३० ते ६.००– पाठांतर स्पर्धा, ६.०० ते ६.३० अखंड हरिनामस्मरण, ६.३० ते ७.३० पालखी उत्सव.
गुरुवार दि. २० डिसेंबर ते गुरुवार २७ डिसेंबर - रोज सकाळी ७ ते ८ श्रींची पूजा व अभिषेक, ८ वा. पासून **आचार्य महेश मुंडले** यांच्याकडून **भागवत संहिता वाचन**, सायंकाळी ५.३० ते ९.३० **कथा निरुपण** (प्रवचन), ९.३० वा. आरती, तीर्थप्रसाद.
तरी या उत्सवाचा लाभ घेण्याचे सर्व भाविकांना सस्नेहपूर्वक निमंत्रण.
आपले नम्र, **कार्यकारिणी**

नोकरी संदर्भ !

सीएसआईआर - राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थान
दोना पौला, गोवा ४०३००४
CSIR - NATIONAL INSTITUTE OF OCEANOGRAPHY
Dona Paula, Goa 403 004

गोवा स्थित अस्थायी पदो के लिए वाक-इन-इंटरव्यू
Walk-in-Interview for temporary post(s) at Goa
विज्ञापन क्र/Advt. No. NIO/HRM/18-19/52

ररक्ति संख्या (पद) Vacancy No (Posts)	अहर्ता Qualifications	पद Post	छात्रवृत्ति (रु.प्रति माह) Stipend (Rs. pm)	साक्षातकार की तारीख एवं समय Date & Time of Interview
MLP1802/1858-18 (1 post)	M.Sc Biochemistry	PA-II	25000	08/01/2019 10 AM
MLP1802/1857-18 (1 post)	M.Sc Physical Oceanography / Marine Science with Physical Oceanography specialization	PA-II	25000	14/01/2019 10 AM
MLP1802/1859-18 (2 posts)	MSc Marine Sciences with specialization in Chemical Oceanography / Marine Chemistry / Analytical Chemistry / Hydrochemistry	PA-II	25000	15/01/2019 10 AM
MLP1802/1860-18 (1 post)	MSc in Marine Sciences (specialization in Marine Biology) / Applied Microbiology / Biotechnology / Zoology / Sub Aqua Marine Ecology and Toxicogenomic.	PA-II	25000	16/01/2019 10 AM

आयु सीमा: PA-II:30 वर्षों में. आरक्षित श्रेणी एवं महिलाओं के लिए 5 वर्ष की आयु में छूट। मकान क्रिराया भत्ता नियमानुसार देय होगा। आवश्यकयोग्यता के लिए कोई भी मान्यता प्राप्त विश्वविधालय से न्यूनतम मार्क्स PA-II: 55% कुल.
Age limits: PA-II:30 years. Age relaxations 5 years for statutory groups and women. HRA will be paid as per rules. Minimum Marks: PA-II:55% in aggregate from any recognized University.
इंटरव्यू का स्थानरू एनआईओ, दोना पाउला, गोवा -४०३००४
Interviews at: NIO, Dona Paula, Goa-403004
अधिक विवरण के लिए वेबसाइट www.nio.org पर जाएँ. Visit www.nio.org for details.

तरुण भारत **धन्वंतरी** आरोग्याचा मूलमंत्र
दिनांक : २०-१२-२०१८
अंतरंग
- मूत्रपिंडाला सूजेची व्याधी–का होते व कधी ?
  – ग्लोमेरुलोनेफ्रायटिसची व्याधीचिकित्सा
- जागरण, रोगाना देते निमंत्रण
  – जागरण तणाव वाढविते
याशिवाय - हेल्दी टिप्स, हेल्थ स्टडी, नोंद इ.
वाचा दर गुरूवारी
ठेवा व्याधीपासून अंतर, सुखी व्हा निरंतर !

बेतोडा येथे बॅटमिंटन स्पर्धा

फोंडा : कुमेड–बेतोडा येथील महाबली शटलर्सतर्फे पाचवी अखिल गोवा बॅटमिंटन स्पर्धा २१ व २२ डिसेंबर रोजी मारूती देवस्थान मैदानावर आयोजित केली आहे. विजेत्यांना प्रथम रू. ७००० व फिरता चषक, द्वितीय रू. ४०००, अशी पारितोषिके देण्यात येतील. अधिक माहितीसाठी संपर्क : आशिष ९५५२१६५३४७.